प्रसिध्दी पत्रक

दिनांक 23/07/2025

आरोपी लोकसेवक - जगदीश गेनुदास गवळी, कृषी सहाय्यक नेमणूक- नारळा गाव, तालुका कृषी अधिकारी कार्यालय वैजापूर ता, वैजापूर, जि, छत्रपती संभाजीनगर, यांनी तक्रारदार यांचेकडे 5,000/- (पाच हजार) रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 5,000/- (पाच हजार) रुपये स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे वैजापुर, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | **आरोपी लोकसेवक** - जगदीश गेनुदास गवळी, वय 41 वर्ष ,पद. कृषी सहाय्यक नेमणूक नारळा गाव, तालुका कृषी अधिकारी कार्यालय वैजापूर ता, वैजापूर, जि, छत्रपती संभाजीनगर, रा. विनायक कॉलनी गंगापूर रोड के के सुरासे यांच्या घरी, भाड्याने ता. वैजापूर जि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 5,000/- (पाच हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 5,000/- (पाच हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>सहा.सापळा अधिकारी | श्री. धर्मराज बांगर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. वाल्मीक कोरे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे मौजे नारळा शिवारात गट क्र.207 मध्ये शेत जमीन आहे. त्या जमिनी वर जलसंधारण योजनेअंतर्गत शेततळे मंजूर झाले होते सदर तळ्याचे मोजमापनुसार त्याच्या लाभाची एकूण रक्कम 2,25,000 (दोन लाख पंचविस हजार) रुपये मंजूर झाली होती त्या मंजूर बिलाचे हप्ते तक्रारदार यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी आरोपी लोकसेवक यांनी यापूर्वी तक्रारदार यांच्याकडून 30,000/ हजार रुपये घेतले होते. सदर मंजूर झालेल्या बिलाचे हप्ते खात्यावर कधी जमा होतील याची माहिती विचारण्यासाठी तक्रारदार हे आरोपी लोकसेवक यांच्याकडे गेले असता आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे पुन्हा 5,000/- (पाच हजार) रुपये लाचेची मागणी केली होती. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे वरील कामा करीता नमुद लोकसेवक हे लाचेची मागणी करीत असल्याने व तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधून दिनांक 23/07/2025 रोजी तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 23/07/2025 रोजी तक्रारदार व पंच यांच्या समक्ष आलोसे श्री गवळी यांच्याकडे पाठवून पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे 5000/- (पाच हजार) रुपय लाच रकमेची मागणी करून लाच रक्कम पंच साक्षीदारा समक्ष स्वतः स्वीकारली. त्यानंतर आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन आलोसे जगदीश गेनुदास गवळी, कृषी सहाय्यक नारळा यांचे विरुध्द पो.स्टे.वैजापुर,छत्रपती संभाजीनगर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-1988 अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे व आलोसे यांचे राहते घराची घरझडती सुरु आहे. |

सदर कार्यवाही श्रीमती माधुरी कांगणे, पोलीस अधीक्षक, श्री.सुरेश ह. नाईकनवरे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक तथा पोलीस उप अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. धर्मराज बांगर, पोलीस निरीक्षक श्री.वाल्मीक कोरे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस हवालदार राजेंद्र जोशि, पो.अंम. युवराज हिवाळे, चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923247986
पोलीस उप अधीक्षक :- 9923247986

( सुरेश ह. नाईकनवरे )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.